# प्रेस नोट

**अँन्टी करप्शनच्या ठाणे घटकाकडून सिंधुदुर्ग मधील महसुल विभागाच्या मालवण तालुक्यातील तलाठी सजा मसुरे मधील ग्राम महसुल अधिकारी यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई...**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक/युनिट | अॅन्टी करप्शन विभाग ठाणे परिक्षेत्र, ठाणे, अॅन्टी करप्शन विभाग सिंधुदुर्ग युनिट |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद कमांक | मालवण पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं 107/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| तकारदार | पुरुष वय ३१ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. निलेश किसन दुधाळ वय २६ वर्षे ग्राम महसुल अधिकारी सजा मसुरे ता. मालवण जि. सिंधुदुर्ग |
| मगणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/– ( चार हजार रुपये ) |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ---- |
| स्विकारलेली लाच रक्कम | ४,०००/– ( चार हजार रुपये ) |
| पडताळणी दिनांक | दि. १८/०७/२०२५ |
| सापळा दिनांक | दि. १८/०७/२०२५ |
| ठिकाण | तलाठी सजा मसुरे कार्यालय ता. मालवण जि. सिंधुदुर्ग |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | विजय पांचाळ, पोलीस उप-अधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग युनिट, मो.नं. ८१०८५२५६६६ |

**थोडक्यात हकीगत :-** यातील तक्रारदार हे गाव वाडी डांगमोडे गावचे पोलीस पाटील असून त्याचे वाडीत राहणारे व सध्या मुंबई येथे वास्तव्यास असलेले नितीन मधुसूदन ठाकुर व संजय रामचंद्र ठाकुर यांचे एकुण ३ वारस तपास करुन देण्यासाठी एकुण ४,०००/- रु. लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी दिनांक १६/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सिंधुदुर्ग येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १८/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, लोकसेवक श्री. निलेश किसन दुधाळ वय २६ वर्षे ग्राम महसुल अधिकारी, तलाठी सजा मसुरे ता. मालवण जि. सिंधुदुर्ग यांने ४,०००/– रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दिनांक १८/०७/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री. निलेश किसन दुधाळ वय २६ वर्षे ग्राम महसुल अधिकारी तलाठी सजा मसुरे ता. मालवण जि. सिंधुदुर्ग यांनी तक्रारदाराकडून तलाठी मसुरे सजा कार्यालयामध्ये लाच घेतली असता त्यांना पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचेविरुध्द मालवण पोलीस ठाणे येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. शिवराज पाटील ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. संजय गोवीलकर ला.प्र.वि. ठाणे परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग युनिटने केलेली आहे.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यक्तिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयातील खालील नमूद कमांकावर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिवराज पाटील पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. परिक्षेत्र ठाणे यांनी केले आहे.

१) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र, ठाणे दुरध्वनी कमांक :- ०२२ - २०८१३५९९
२) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सिंधुदुर्ग युनिट दुरध्वनी कमांक : - ०२३६२ - २२२२८९,
३) टोल फ्री कमांक - १०६४,
४) वेबसाईट :- www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार :- www.acbmaharashtra.net.in

( विजय पांचाळ )
पोलीस उप-अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग

Scanned with CamScanner